**महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची ६०६ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पोलीस-११२३/प्र.क.६/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०१ ऑक्टोबर, २०२६

**वाचा :-**

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६
२) विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/पोउनि-मविस्पप-२०२३/१०६/२०२३, दि.०४.०९.२०२६

**प्रस्तावना:-**

पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा-२०२३ मधील ६०४ उमेदवार व मागील सत्रामधील मुदतवाढ मिळालेले ०२ उमेदवार अशा एकूण ६०६ उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे ९ महिन्यांचे मुलभूत प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे प्रशिक्षण सत्र क्र.१२९ मध्ये दि.०४.०८.२०२६ पासून सुरु करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरीता महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची ६०६ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा-२०२३ मधील ६०४ उमेदवार, मागील सत्रामधील मुदतवाढ मिळालेले पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा-२०१६ मधील ०१ उमेदवार व पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा-२०२१ मधील ०१ उमेदवार अशा एकूण ६०६ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर दि.०४.०८.२०२६ ते दि.०४.०५.२०२७ या कालावधीसाठी पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची ६०६ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पदे विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या रिक्त असलेल्या पदांच्या अधिनतेने निर्माण करण्यात आली असल्याने सदर पोलीस उप निरीक्षकांची

रिक्त पदे ज्या आस्थापनेवर आहेत त्या आस्थापनेवर वेतन काढले जाणार नाही याची खात्री करण्यात यावी.

३. याकरीता होणारा खर्च वित्तीय वर्ष सन २०२६-२७ व सन २०२७-२८ साठी " मागणी क्र.बी-१, २०५५, पोलीस, ००, १०९, जिल्हा पोलीस दल, (००), (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८) (अनिवार्य), ०१, वेतन" या लेखाशिर्षाखाली संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.०२.२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००११४३०४७७८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHAILESH SHASHIKANT SURVE

Digitally signed by SHAILESH SHASHIKANT SURVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=DE61AC402EF01EEC8D6C6D90FB32C82CC308744E2B851CC16FB39FE7CE1F1DD3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0E8ED2F069FE90F6EA4E2DFC43BD83581600732F141DAF3517043067D7724F4B, cn=SHAILESH SHASHIKANT SURVE
Date: 2026.10.01 14:32:07 +05'30'

**(शैलेश श. सुर्वे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१०. निवडनस्ती (पोल-५अ)